## कार्यकारी सारांश

१. जयगड पॉवरट्रान्स्को लि. (जेपीटीएल) ही जेएसडब्ल्यु एनर्जी लि. (जेएसडब्ल्युईएल) आणि महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कं.लि. (एमएसईटीसीएल) यांचा संयुक्त उपक्रम असून हा उपक्रम ४०० केव्ही डी/सी (क्वाड) जयगड-न्यू कोयना आणि जयगड-कराड ट्रान्समिशन लाईन्सची उभारणी, चलनवलन आणि देखभाल तसेच संलग्न संसाधने आणि टर्मिनल बे ई. यासह सुरु आहे.

२. माननीय आयोगाने जेपीटीएलला ट्रान्समिशन परवाना (परवाना क्र. १ स २००९) दि. ८ फेब्रुवारी २००९ रोजी २५ वर्षांसाठी जारी केला आहे. वरील नमूद केलेल्या ट्रान्समिशन व्यवस्थेची उभारणी, चलनवलन आणि देखभाल तसेच संलग्न संसाधने यासाठी हा परवाना आहे. त्यामुळेच वीज कायदा २००३ नुसार, जेपीटीएल ही वरील नमूद ट्रान्समिशन व्यवस्थेकरीता महाराष्ट्र राज्यांतर्गत ट्रान्समिशन परवानाधारक आहे.

३. जेपीटीएलने दि. २८जानेवारी २०१६ रोजी तिसऱ्या नियंत्रीत कालावधी आर्थिक वर्षे २०१७-१८ आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीताची स्वतःची बहुवर्षीय वीज दर याचिका दाखल केली. माननीय आयोगाने आपल्या आदेश दि. २७ जुन २०१७ नुसार तिसऱ्या नियंत्रित कालावधी करीताची जेपीटीएलची एकूण महसूली गरज मंजूर केली आहे.

४. जेपीटीएलने हया याचिकेद्वारे आर्थिक वर्ष २०१५-१६ चे अचुक समायोजन महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) विनियम २०११ नुसार दाखल केले आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ चे अचुक समायोजन, आर्थिक वर्ष २०१७-१८ चे तात्पूरते अचुक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० चे मध्यावधी कामगिरी समीक्षा यांची याचिका महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) विनियम २०१५ नुसार माननीय आयोगास दि. २९ नोव्हेंबर २०१७ रोजी सादर केली आहे.

५. त्यानंतर माननीय आयोगाने संदर्भीय केस क्र. १६७-२०१७ नुसार. माहिती फरक प्रश्नावली संच -१. एमईआरसी इमेलद्वारे दि. ८ डिसेंबर २०१७ आणि २२ डिसेंबर २०१७ द्वारे सुचित केले. तसेच दि. १२ डिसेंबर २०१७ रोजी एमईआरसीच्या अधिकाऱ्यांसोबत माहिती फरका संदर्भात सखोल चर्चा करण्यात

आली आणि त्यानुसार माहिती फरकामधील आवश्यक सुधारणा समाविष्ट करुन सुधारीत याचिका दाखल करण्यासंदर्भात सुचित करण्यात आले.

६. त्याला अनुसरुन माननीय आयोगाने दिलेल्या वरील सुचनेनुसार जेपीटील ने आवश्यक त्या संबंधीत खुलाशासह आणि निर्देशीत माहिती फरकासह सुधारीत याचिका दाखल केलेली आहे.

७. वित्तीय वर्ष २०१५-१६ चे अचूक समायोजन :-

जेपीटीएल ते वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या अचूक समायेजनेचा भाग म्हणून वित्तीय वर्ष २०१५-१६ ची एकूण महसूल गरज मोजली आहे. जेपीटीएल ने वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या वार्षिक लेखापरिक्षण खाते आधारीत प्रत्यक्ष खर्च सादर केला आहे. आणि हे एमईआरसी (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०११ च्या नियमावर आधारीत आहे. माननीय आयोगाने दि. २७ जून २०१६ रोजी एमईआरसी आदेश केस क्र. १२, २०१६ नुसार मंजूर खर्चावर आधारीत खर्चाचे विविध घटकांची सखोल तुलना वित्तीय वर्ष २०१५-१६ चे अचूक समायोजन प्रकरणामध्ये सादर केली आहे. तरी वित्तीय वर्ष २०१५-१६ चे मंजूर एकूण महसूली गरजेवर आधारीत वित्तीय वर्ष २०१५-१६ चे प्रस्तावित अचूक समायोजनाचा सारांश खालील तक्त्यामध्ये सादर केला आहे.

**तक्ता क्र. १ वित्तीय वर्ष २०१५-१६ चे बहुवर्षीय वीज दर आदेश आणि लेखपरिक्षीत खात्यामधील तुलना (रुपये कोटींमध्ये)**

| अ. क्र. | तपशिल | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ तोटयाची विभागणी झाल्यावर निव्वळ शिल्लक लागू रक्कम | तफावत |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यान्वयन व देखरेख खर्च | ६.८६ | ३.३४ | ५.६९ | -१.१७ |
| २ | घसारा | २९.३५ | २९.३५ | २९.३५ | ०.०० |
| ३ | दीर्घ मुदत कर्जावरील व्याज | ३४.४२ | ३४.५१ | ३४.५१ | ०.०८ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १.७२ | २.८८ | २.११ | ०.३९ |
| ५ | आकस्मिक राखीव योगदानाची रक्कम | १.३९ | १.३९ | १.३९ | ०.०० |
| ६ | आयकर खर्च | १३.४० | १३.१३ | १३.१३ | -०.२७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | **एकूण महसूली खर्च** | **८७.१४** | **८४.५९** | **८६.१७** | **-०.९७** |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | २१.६३ | २१.६३ | २१.६३ | ०.०० |
| ९ | **एकूण महसूली गरज** | **१०८.७८** | **१०६.२२** | **१०७.८०** | **-०.९८** |
| १० | वजा : वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न | २०.६६ | ०.४७ | ०.४७ | -२०.१९ |
| ११ | अधिक : प्रोत्साहन अधिदान | ०.०० | १.९२ | १.९२ | १.९२ |
| १२ | **निव्वळ एकूण महसूली गरज** | **८८.१२** | **१०७.६६** | **१०९.२४** | **२१.१२** |
| १३ | अधिकः वर्ष २०१२-१३ चे येणे असलेल्या व्याजासह फरक / (अतिरिक्त) | १४.७४ | १४.७४ | १४.७४ | ०.०० |
| १४ | अधिकः वर्ष २०१३-१४ चे येणे असलेल्या व्याजासह फरक / (अतिरिक्त) | ९.९३ | ९.९३ | ९.९३ | ०.०० |
| १५ | अधिकः वर्ष २०१४-१५ चे येणे असलेल्या व्याजासह महसूली फरक / (अतिरिक्त) | २.६३ | २.६३ | २.६३ | ०.०० |
| १६ | अधिक : वर्ष २०१०-११ व २०११-१२ चे गत कालावधीतील २ महिन्यांची वसुली | १४.४६ | १४.४६ | १४.४६ | ०.०० |
| १७ | अधिक आकस्मिक राखीवसाठी येणे असलेले व्याज /देणे असलेले व्याज | -०.८० | -०.८० | -०.८० | ०.०० |
| १८ | **मागील फरकासह एकूण वार्षिक महसूली गरज** | **१२९.०८** | **१४८.६२** | **१५०.२०** | **२१.१२** |

८. वित्तीय वर्ष २०१६-१७ चे अचूक समायोजन -

जेपीटीएल ते वित्तीय वर्ष २०१६-१७ च्या अचूक समायेजनेचा भाग म्हणून वित्तीय वर्ष २०१६-१७ ची एकूण महसूल गरज मोजली आहे. जेपीटीएल ने वित्तीय वर्ष २०१६-१७ च्या वार्षिक लेखापरिक्षण खाते आधारीत प्रत्यक्ष खर्च सादर केला आहे. आणि हे एमईआरसी (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०१५ च्या नियमावर आधारीत आहे. माननीय आयोगाने दि. २७ जून २०१६ रोजी एमईआरसी आदेश केस क्र. १२, २०१६ नुसार मंजूर खर्चावर आधारीत खर्चाचे विविध घटकांची सखोल तुलना वित्तीय वर्ष २०१६-१७ चे अचूक समायोजन प्रकरणामध्ये सादर केली आहे. तरी वित्तीय वर्ष २०१६-१७ चे मंजूर एकूण महसूली गरजेवर आधारीत वित्तीय वर्ष २०१६-१७ चे प्रस्तावित अचूक समायोजनाचा सारांश खालील तक्त्यामध्ये सादर केला आहे.

## तक्ता क्र. २ वित्तीय वर्ष २०१६-१७ चे बहुवर्षीय वीज दर आदेश आणि लेखपरिक्षीत खात्यामधील तुलना (रुपये कोटींमध्ये)

| अ. क्र. | तपशिल | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ तोटयाची विभागणी झाल्यावर निव्वळ शिल्लक लागू रक्कम | तफावत |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यान्वयन व देखरेख खर्च | ४.३५ | ४.१४ | ४.२१ | -०.१४ |
| २ | घसारा | २९.३५ | २९.२५ | २९.२५ | -०.१० |
| ३ | दीर्घ मुदत कर्जावरील व्याज | २९.१६ | २९.०२ | २९.०२ | -०.१४ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १.८९ | २.२४ | २.०१ | ०.१२ |
| ५ | आकस्मिक राखीव योगदानाची रक्कम | १.३९ | १.३८ | १.३८ | -०.०१ |
| ६ | आयकर खर्च | ५.६१ | ६.०० | ६.०० | ०.३९ |
| ७ | **एकूण महसूली खर्च** | **७१.७६** | **७२.०३** | **७१.८७** | **०.१२** |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | २१.६३ | २१.५४ | २१.५४ | -०.०९ |
| ९ | **एकूण महसूली गरज** | **९३.३९** | **९३.५८** | **९३.४१** | **०.०३** |
| १० | वजा : वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न | ०.५५ | ०.५६ | ०.५६ | ०.०१ |
| ११ | अधिक : प्रोत्साहन अधिदान | ०.०० | ०.७८ | ०.७८ | ०.७८ |
| १२ | **निव्वळ एकूण महसूली गरज** | **९२.८३** | **९३.७९** | **९३.६३** | **०.७९** |
| १३ | आर्थिक वर्ष २०१४-१५ चे येणे असलेले व्याज / देणे असलेले व्याजासह महसूली फरक /(अतिरिक्त) | **-०.३८** | **-०.३८** | **-०.३८** | **०.००** |
| १४ | आर्थिक वर्ष २०१५-१६ चा महसूली फरक आणि (अतिरिक्त) खर्च | २.९७ | २८.६२ | २८.६२ | २५.६५ |
| १५ | वजा : मार्केटमध्ये गुंतवलेल्या अतिरिक्त फंडावर मिळणारा परतावा | ०.०० | -२.८९ | -२.८९ | -२.८९ |
| **१६** | **मागील फरकासह एकूण वार्षिक महसुली गरज** | **९५.४२** | **११९.१४** | **११८.९८** | **२३.५५** |

९.वित्तीय वर्ष २०१७-१८ चे तात्पुरते अचुक समायोजन

एमईआरसी (बहुवार्षिक वीजदर) विनियम २०१५ च्या तरतूदीनुसार वित्तीय वर्ष २०१७-१८ चे तात्पुरते अचूक समायोजन हे बहुवर्षीय वीज दर आदेश मधील मंजूर अंदाज आणि खर्च वार्षिक निकालांवर आधारीत आहे. एकूण महसूली गरजेचा सारांश खालील तक्त्यामध्ये नमुद केला आहे.

**तक्ता क्र. ३ वित्तीय वर्ष २०१७-१८ चे तात्पुरते अचुक समायोजन (रुपये कोटींमध्ये)**

| अ.क्र | तपशिल | वित्तीय वर्ष २०१७-१८ | |
|---|---|---|---|
| | | मंजूर | तात्पुरते |
| १ | कार्यान्वयन व देखरेख खर्च | ४.५७ | ४.४४ |
| २ | घसारा | २९.३९ | २९.१० |
| ३ | दीर्घ मुदत कर्जावरील व्याज | २६.०७ | २४.९५ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १.८५ | १.७९ |
| ५ | आकस्मिक राखीव योगदानाची रक्कम | १.३९ | १.३८ |
| ६ | आयकर खर्च | ५.६१ | ६.०० |
| ७ | **एकूण महसूली खर्च** | **६८.८७** | **६७.६६** |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | २१.६८ | २१.४७ |
| ९ | **एकूण महसूली गरज** | **९०.५५** | **८९.१३** |
| १० | वजा : वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न | ०.६७ | ०.६८ |
| ११ | अधिक : नफा /तोटा आणि कर्जाचे पुर्नवाटप यांची विभागणी झाल्यावर मिळणारा निव्वळ हक्क बहुवर्षीय वीज दर विनियम २०१५ चा अधिनियम २९.१० | | ०.६१ |
| १२ | **निव्वळ एकूण महसूली गरज** | **८९.८८** | **८९.०६** |
| १३ | **एकूण वार्षिक महसुली गरज** | **८९.८८** | **८९.०६** |

१०. वित्तीय वर्ष २०१८-१९ व २०१९-२० चे मध्यावधी कामगिरी समीक्षा.

एमईआरसी (बहुवार्षिक वीज दर) विनियम २०१५ च्या तरतूदनुसार वित्तीय वर्ष २०१८-१९ व २०१९-२० चे मध्यावधी कामगिरी समीक्षा ही बहुवार्षिक वीज दर आदेशामधील मंजूर अंदाजावर आधारीत आहे. एकूण महसूली गरजेचा सारांश खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ४ वित्तीय वर्ष २०१८-१९ व २०१९-२० चे मध्यावधी कामगिरी समीक्षा**
**(रुपये कोटींमध्ये)**

| अ.क्र | तपशिल | वित्तीय वर्ष २०१८-१९ | | वित्तीय वर्ष २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | अंदाजे | मंजूर | अंदाजे |
| १ | कार्यान्वयन व देखरेख खर्च | ४.७९ | ४.७९ | ५.०२ | ५.०२ |
| २ | घसारा | २९.४२ | २९.१६ | २९.४१ | २९.२० |
| ३ | दीर्घ मुदत कर्जावरील व्याज | २२.९७ | १९.५० | १९.७९ | १६.८७ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १.८२ | १.५५ | १.७८ | १.५३ |
| ५ | आकस्मिक राखीव योगदानाची रक्कम | १.३९ | १.३८ | १.३९ | १.३९ |
| ६ | आयकर खर्च | ५.६१ | ६.०० | ५.६१ | ६.०० |
| ७ | **एकूण महसूली खर्च** | **६५.९९** | **६२.३७** | **६३.००** | **५९.९९** |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | २१.७२ | २१.५४ | २१.७२ | २१.५९ |
| ९ | **निव्वळ एकूण महसूली गरज** | **८७.७२** | **८३.९१** | **८४.७२** | **८१.५७** |
| १० | वजा : वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न | ०.७९ | ०.७९ | ०.९० | ०.९१ |
| ११ | अधिक : नफा /तोटा आणि कर्जाचे पुर्नवाटप यांची विभागणी झाल्यावर मिळणारा निव्वळ हक्क बहुवर्षीय वीज दर विनियम २०१५ चा अधिनियम २९.१० | | ०.९५ | | ०.८२ |
| १२ | **निव्वळ एकूण महसूली गरज** | **८६.९३** | **८४.०७** | **८३.८२** | **८१.४९** |
| १३ | आर्थिकः वर्ष २०१५-१६ व २०१६ -१७ चे फरक / (अतिरिक्त) | | **१५.९६** | | |
| १४ | अधिकः वर्ष २०१७-१८ चे फरक /(अतिरिक्त) | | **-०.८१** | | |
| १५ | वरिल फरकाचे येणे असलेले व्याज | | **५.४०** | | |
| **१६** | **मागील फरकासह एकूण वार्षिक महसुली गरज** | **८६.९३** | **१०४.६१** | **८३.८२** | **८१.४९** |